# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य २०२१/डीबीटी/ 100 86 दि.०७.०९.२०२१

**तात्काळ ईमेलद्वारा** 8 SEP 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ :- १. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि-२०११/प्र.क्र. ४४/ ११/ का.६, दि. १४ ऑक्टोंबर, २०११.

२. माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. GAD-मातंस–2018/C.R.138/S.1/39, दि. १२ ऑक्टोंबर, २०१८

३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/९८८६, दि. ३.०९.२०२१

उपरोक्त विषयाबाबत राज्यशासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ज्यामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनेचाही समावेश आहे. सदर योजनेचे शासन निर्णय व माहिती महाडीबीटी पोर्टल तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संदर्भिय अल्पसंख्यांक विकास विभागाचा, शासन निर्णय दि. १४ ऑक्टोंबर, २०११ अन्वये, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनेसाठी एकूण २००० संच निर्धारित केलेले आहेत. तथापि सदरहू निर्धारित संच पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर शिष्यवृत्तीसाठी निर्धारित संच पूर्ण न होण्याची कारणे शोधून विद्यार्थी / महाविद्यालये यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे.

सदर शिष्यवृत्ती साठी महाडीबीटी पोर्टलवरुन सन २०१९-२० करीता ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत, तथापि त्रूटीपूर्ततेसाठी सदरहू अर्ज विद्यार्थ्यांना त्यांचे लॉगीनवर परत पाठविलेले आहेत, अशा अर्जांचे Re-Apply करणेसाठी दि. १५.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी दि. ३०.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीठ यांचेमार्फत कळविण्यात यावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाचे कुलसचिव, तसेच संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. प्रकाश बच्छाव)**
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- १. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner